गोपाळ कृष्ण गोखले

---

ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग

# गोपाळ कृष्ण गोखले

ब्रिटिश राजपट व भारतीय नेमस्त युग

बलराम नंदा

अनुवादक– वसंत पळशीकर

विश्वकर्मा साहित्यालय

एकमेव विक्रेते
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव नाका, मुंबई ४
शनिपाराजवळ, बाजीराव रोड, पुणे २

ह्या प्रकाशनाला साहित्य संस्कृती
मंडळाचे अनुदान मिळाले आहे.
(ज. क्र. दा. पु. वि. ८६/१५३९
दि. १०-१०-८६ ). त्याबद्दल आम्ही
अतीशय ऋणी आहोत.

प्रकाशक :
सौ. मालती माटे
विश्वकर्मा साहित्यालय
२०३५/२ सदाशिव पेठ
टिळक पथ, पुणे ४११ ०३०

© बलराम नंदा

२ ऑक्टोबर, १९८६

श्री. बी. आर्. नंदा व
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई
यांच्या अनुमतीने

मूल्य दोनशे रुपये

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ, पुणे ३०

बाबांसे

# प्रस्तुत अनुवादाच्या निमित्ताने...

श्री. बलराम नंदा हे भारतातील आजचे एक ख्यातनाम चरित्रकार आहेत. म. गांधी, नेहरू पितापुत्र ('द नेहरुज्') या त्यांच्या इंग्रजीतील चरित्रग्रंथांप्रमाणे त्यांचे 'गोखले' चरित्रही महत्त्वाचे गणले जाते. श्री. नंदा यांच्या या चरित्र-त्रयीतून ब्रिटिश राजवटीतील आधुनिक भारताचा राजकीय इतिहास त्यातील विविध घटना, घडामोडी, व्यक्ती-प्रवृत्तींसह साक्षात् होतो. प्रस्तुतच्या 'गोखले' चरित्रात कालदृष्टया कॉंग्रेसच्या स्थापनेपासून ते पहिल्या महायुद्धाच्या आरंभा-पर्यंतचा पट (१८८५-१९१५) साकार झालेला आहे. या कालखंडात भारताच्या इतिहासात व राजकारणात ज्या विविध घडामोडी घडल्या, त्यांत नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा या ना त्या प्रकारचा सहभाग होता. विशेषत: या काळातील नेमस्त वृत्तीच्या भारतीय पुढाऱ्यांच्या ज्या हालचाली होत होत्या, दृष्टिकोण निर्माण झाले होते, पवित्रे टाकले जात होते, त्यांचे सम्यक् दर्शन श्री. नंदा यांच्या प्रस्तुतच्या गोखले चरित्रात होते. म्हणूनच त्यांनी आपल्या या चरित्राला 'ब्रिटिश राजवट आणि भारतीय नेमस्ते युग' असा उपमथळा दिला आहे. प्रस्तुतचे गोखले चरित्र यामुळेच केवळ व्यक्तिकेंद्रित न राहता, त्याला एक व्यापक परि-माण प्राप्त झाले आहे. समाजाबद्दल कळकळ बाळगणाऱ्या नवशिक्षित भारती-यांचा एकोणिसाव्या शतकात तत्कालिन इंग्रज शासनकर्त्यांशी व शासनाबाहेरील इंग्रज विचारवंतांशी संबंध आला. त्यातूत उलटसुलट क्रिया-प्रतिक्रिया जन्माला आल्या, त्या सर्वांचा एक संकुल आणि साधार पट नंदा यांच्या या चरित्रग्रंथाद्वारा उलगडला जातो. एकोणिसाव्या शतकातील इंग्लंड-भारत संबंधांचे, तदनुषंगिक राजकारणाचे, सांस्कृतिक परिवर्तनाचे स्वरूप, कक्षा, परिभ्रमण, सामर्थ्य आणि मर्यादा अवलोकन करण्याच्या दृष्टीने या चरित्रग्रंथाचे विशेष महत्त्व आहे. या प्रकारची माहिती साधार, साकल्याने आणि समतोलपणे प्रकट करणारा साक्षेपी

ग्रंथ आज तरी मराठीत उपलब्ध नाही. नंदा यांच्या 'गोखले' ग्रंथाचा मराठीत अनुवाद करून तो सादर करण्याचे प्रमुख उद्दिष्ट हेच. हे उद्दिष्ट यशस्वीपणे सिद्धीस नेल्याबद्दल या चरित्रग्रंथाचे अनुवादक श्री. वसंतराव पळशीकर आणि प्रकाशक श्री. राजाभाऊ माटे यांचे अभिनंदन केले पाहिजे.

भारतीय राजकारणाला वळण देणाऱ्या महाराष्ट्रीयांत न्या. रानडे, लो. टिळक आणि ना. गोखले यांचा मोठा वाटा आहे. न्या. रानडे, लो. टिळक किंवा ना. गोखले यांची माहिती देणारी अनेक लहान–मोठी चरित्रे मराठीत उपलब्ध आहेत. पण यांतील एकही चरित्रग्रंथ श्री. नंदा यांच्या पद्धतीने लिहिला गेलेला नाही. श्री. पळशीकर यांनीच या ग्रंथाचा चिकित्सक परिचय काही कालापूर्वी ('मौज' दिवाळी अंक, १९७८) मराठी वाचकांना करून दिला होता. तेव्हापासून या चरित्र-ग्रंथाबद्दल विशेष आकर्षण निर्माण झाले होते. हा ग्रंथ आता समग्रपणे मराठीत येत आहे ही विशेष आनंदाची गोष्ट वाटते. यामुळे मराठीतील चरित्रपर अनुवाद-ग्रंथांत एक मोलाची भर पडत आहे.

चरित्रलेखनाच्या अनेक पद्धती वा परी संभवतात. आपल्या चरित्रग्रंथाचे स्वरूप कोणते ठेवावयाचे, अथवा केंद्र कोणते कल्पावयाचे, हे त्या त्या चरित्रलेखकाच्या उद्दिष्टावर, प्रवृत्तीवर, प्रकृतीवर अवलंबून असते. आपल्या चरित्रग्रंथाला कोणता घाट द्यावयाचा किंवा द्यावयाचा नाही, हा त्या त्या लेखकाच्या अखत्यारीतील प्रश्न आहे. तथापि लेखनपद्धती किंवा प्रकार कोणताही कल्पिला, तरी त्यातून चरित्रनायकाची वृत्ति-प्रवृत्ती, वैशिष्ट्ये, कर्तृत्वस्वरूप, त्याचे मर्म, महत्त्व व मर्यादा प्रकट व्हाव्यात; त्यात चरित्रनायकाच्या कालाचे सर्वांगीण अनुसंधान असावे; विवेचनपद्धती साधार, समतोल, सहृदय पण चिकित्सक असावी; अशी अपेक्षा असते. श्री. नंदा यांचे प्रस्तुतचे गोखले चरित्र या साऱ्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल करणारे आहे.

आधुनिक भारताच्या प्रारंभकालीन राजकीय जडणघडणीत, उपक्रमांत नामदार गोखले यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. विधायक स्वरूपाच्या आधुनिक भारतीय प्रबोधनयुगाचे ते प्रणेते नसले, तरी महत्त्वाचे पाईक, प्रतिनिधी आणि प्रवक्ते आहेत. दादाभाई नवरोजी, न्या. रानडे आणि महात्मा गांधी यांच्यामधील एक महत्त्वाचा दुवा म्हणूनही गोखले यांना एक विशेष महत्त्व आहे. इंग्रजी राजवटीच्या आगमना-मुळे भारतात जी विविध स्थित्यंतरे झाली; राजकारण, समाजकारणविषयक सनदशीर स्वरूपाचा जो आशावादी आणि श्रद्धान्वित दृष्टिकोण प्राप्त झाला; राष्ट्रविषयक जी नवनैतिकता, आध्यात्मिकता, समर्पणवृत्ती उदयाला आली; तिचा प्रकर्ष गोखले यांच्या आचारविचारांत आणि उच्चारांत झाल्याचे जाणवते. 'भारत-सेवकसमाज' च्या रूपाने त्यांची स्मृती महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर चिरस्थायी झाली आहे. जन्माने महाराष्ट्रीय असूनही ज्या व्यक्तींनी भारतातील व भारता-

बाहेरील सुसंस्कृत व्यक्तींची व कार्यकर्त्यांची मने आपल्या सौजन्याने वेधून घेतली, त्यांत गोखले अग्रस्थानी आहेत. त्यांच्या तोडीचे अभ्यासू वृत्तीचे फारच थोडे संसदपटू आजवर महाराष्ट्रात जन्माला आले. गोखले यांच्या व्यक्तित्वामुळे व कर्तृत्वामुळे महाराष्ट्राची मान उंचावण्यास फार मोठे साह्य झाले आहे.

पण नवलाची गोष्ट अशी की, आजवर गोखले यांच्या या कर्तृत्वाची आत्मीय पद्धतीची दखल परप्रांतीयांकडून जवढी आणि जशी घेतली गेली आहे, तशी मराठी माणसांकडून घेतली गेलेली नाही; आणि जी काही दखल घेतली गेली आहे, ती अपुरी तर आहेच पण तीत जिव्हाळ्याचा अभावही जाणवतो. गोखले यांच्या हयातीतच नव्हे तर त्यांच्या निधनानंतरही त्यांचे कर्तृत्व भरघोसपणे महाराष्ट्रापुढे मराठीतून अद्यापि आलेलेच नाही. याचे महत्त्वाचे कारण बहुसंख्य महाराष्ट्रीय ना. गोखले यांच्याकडे जे पाहतात ते लो. टिळकांचे प्रतिद्वंद्वी या एकाच दृष्टीने. गोखले यांच्याकडे या एकाच दृष्टिकोणातून पाहिले गेल्यामुळे दादासाहेब खापर्डेसारख्या टिळकभक्ताला गोखले यांच्या निधनाचे वृत्त ऐकून गोखले यांच्याबद्दल कमालीचे अनुदार उद्‌गार स्वतःच्या डायरीत नोंदविण्याची खंत वाटली नाही. 'काल रात्री गोपाळ कृष्ण गोखले यांचे देहावसान झाल्याचे मी आज बाररूममध्ये ऐकले. स्वतःचा दुटप्पीपणा आणि बदनामी यांचे परिणाम भोगायला लागण्या आधीच ते गेले, याचे मला दुःख झाले.' (पृ. ६७३)

वस्तुतः गोखले आणि टिळक यांचे तसे काही व्यक्तिगत वैर नव्हते. टिळकांच्या उदाहरणाने प्रेरित होऊनच गोखल्यांना सार्वजनिक कार्यात प्रविष्ट होण्याची प्रेरणा मिळाली होती. काही काळ तरी परस्परांचे सहकारी म्हणून ते एकाच शिक्षणसंस्थेत वावरले होते. दोघांच्या वृत्तिप्रवृत्तींत, दृष्टिकोणांत, कार्यपद्धतींत फरक होता हे खरे; गोखले नेमस्त वृत्तीचे उपासक, तर टिळक जहाल बाण्याचे. एक सनदी राजकारणावर सातत्याने भर देणारा, तर दुसरा इंग्रजविषयक असंतोषाचा वन्ही जनमानसात चेतविता येईल तेवढा चेतवीत राहणारा. वस्तुतः तत्कालीन एकाच राजकीय नाण्याच्या या दोन बाजू होत्या; देशसेवा हेच या दोघांचे जीवनव्रत होते. तथापि स्वभावभेदामुळे आणि तत्कालीन परिस्थितीमुळे ते एकमेकांचे प्रतिद्वंद्वी म्हणून गणले गेले. महाराष्ट्रामध्ये लोकप्रियतेचा फार मोठा भाग टिळकांच्या वाट्याला आला, तर गोखले दीर्घकाल लोकांच्या रोषाचे बळी ठरले. या उभयतांच्या निधनानंतरही या वस्तुस्थितीत फारसा बदल झाला नाही. या दोघांच्या कर्तृत्वाच्या वस्तुनिष्ठ तपशिलात न शिरता, या दोघांकडे विशिष्ट दृष्टीने पाहण्याचे संकेतच महाराष्ट्रात रूढ झाले. यामुळे गोखले यांच्या ठिकाणी असलेल्या विविध गुणांची बूज जशी परप्रांतांत झाली, तशी महाराष्ट्रात होऊ शकली नाही. महाराष्ट्र दीर्घकाल एकांडेपणे टिळकभक्तीच्या महापुरातच वाहात राहिला.

या वस्तुस्थितीचे प्रत्यंतर सानेगुरुजींसारख्या सात्त्विक वृत्तीच्या व्यक्तीने

१९२५ साली लिहिलेल्या गोखले चरित्रातही येते. ( 'नामदार गोखले चरित्र' व्हीनस प्रकाशन, पुणे.) या चरित्राच्या नायकपदी गोखले असले, तरी अधिकतर गुणगान आहे ते टिळकांचे. येथे टिळकांच्या सर्व कृतींचे सरसकट समर्थनच आढळते. यामुळे टिळकांनी संस्था का काढल्या नाहीत, याचे उत्तर काढलेल्या संस्था मोडल्या जातात हे टिळकांना माहीत होते म्हणून, असे विलक्षण विधान करण्यास हा लेखक येथे कचरत नाही. ( पृ. २३९ ). टिळकांच्या निधनानंतरही साने गुरुजींसारख्या सहृदय व्यक्तीवरही असलेल्या प्रचंड टिळकप्रभावाचेच हे गमक म्हणावे लागेल.

साने गुरुजी यांचे गोखले चरित्र टिळकांच्या निधनानंतरच्या नजीकच्या काळात तरी लिहिले गेले आहे, पण गोखले जन्मशताब्दीच्या निमित्ताने पु. पां. गोखले यांनी लिहिलेले गोखले चरित्र पाहता ( नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९६६ ), ते बालबोध तर आहेच, पण टिळक-गोखले संबंधात गोलमाल वृत्ती धारण करणारे आहे. तुलनेने गोखले जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र परिचय केंद्राने ( महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली ) काढलेला गोखले जन्मशताब्दी अभिवादन ग्रंथ अधिक स्वागतार्ह वाटतो. पण या ग्रंथातही पुन्हा मर्मज्ञतेच्या दृष्टीने उठून दिसतात ते गांधी, सरोजिनी नायडू, पं. कुंझरू प्रभृती महाराष्ट्रीयेतर व्यक्तींचे लेख.

साने गुरुजी किंवा पु. पां. गोखलेलिखित चरित्रांची कक्षा मर्यादित आहे जन्मशताब्दीनंतर वर्षभराने (१९६७) प्रसिद्ध झालेले प्रा. न. र. फाटक यांचे 'भारतसेवक गोखले' हे चरित्र तुलनेने अधिक महत्त्वाचे ठरते. किंबहुना गोखले यांची बाजू सविस्तरपणे मांडणारे मराठीतील सर्वाधिक विस्तृत आणि अधिकृत स्वरूपाचे चरित्र म्हणून प्रा. न. र. फाटक यांनी लिहिलेल्या या चरित्राकडेच अंगुलिनिर्देश करावा लागेल.

प्रा. न. र. फाटक हे महाराष्ट्रात आपल्या मुरब्बी आणि विचक्षण विचारांबद्दल, व्यासंगी वृत्तीबद्दल, सूक्ष्म आणि चौरस माहिती संग्रहित करण्याबद्दल विख्यात आहेत. गोखले चरित्राखेरीज त्यांनी प्राचीन संतकवी आणि आधुनिक काळातील न्या. रानडे आणि लो. टिळक यांचे चरित्रग्रंथ लिहिले आहेत. गोपाळ कृष्ण गोखले ज्या नेमस्त पक्षाची धुरा वाहात होते, त्या पक्षाबद्दल फाटक यांना विशेष आदरही वाटत होता. श्री. नंदा यांच्याप्रमाणे प्रा. फाटकांना चरित्रलेखनाच्या संदर्भात गोखलेविषयक शासकीय वा देशी-विदेशी सामुग्री, कागदपत्रे उपलब्ध झाली नव्हती. ( तसा त्यांनी प्रयत्नही केला नसावा. ) तथापि भारतसेवक समाजाने गोखले चरित्रलेखनाची कामगिरी प्रा. फाटक यांच्याकडे आवर्जून आणि दीर्घकालापासून सोपविली होती. एवढेच नव्हे तर भारतसेवक समाजाने आपल्या जवळची सर्व साधने त्यांना उपलब्धही करून दिली होती. 'मौज प्रकाशन' सारख्या मराठीतील मान्यताप्राप्त प्रकाशन संस्थेने गोखले जन्मशताब्दीच्या निमित्ताने हे फाटकलिखित गोखले चरित्र प्रसिद्ध केले आहे; हे सर्व लक्षात घेता, फाटक यांच्या या

चरित्रात गोखले यांचे जीवन, काल व कर्तृत्व यांबाबत साधार, सविस्तर स्वरूपाची माहिती उपलब्ध होईल, अशी अपेक्षा बाळगली जाणे स्वाभाविक ठरते. यात तशी थोडी नवी माहिती आहेही (उदा. गोखले यांची निंदा असलेली मेळ्यातील काही पदे). पण या चरित्रग्रंथाचे एकंदर स्वरूप पाहता, ते नंदा यांच्या गोखले चरित्रा-इतके पारदर्शी किंवा तलस्पर्शी वाटत नाही.

श्री. नंदा यांनी आपल्या चरित्रग्रंथाची बांधणी जशी व्यापक भूमिकेतून व्यासंगपूर्ण व सौष्ठवयुक्त पद्धतीने केली आहे, जी अभिज्ञता व साक्षेप प्रकट केला आहे, तो फाटक यांच्या गोखलेचरित्रात प्रमाणतः कमी आढळतो. त्याचे स्वरूप आंतरदर्शी न होता बहिर्लक्षी झाले आहे. फाटकांच्या मांडणीत योजनापूर्वकता किंवा सुघटितपणा तर नाहीच पण उपलब्ध माहितीचे उपयोजनही पूर्णतया आणि योग्यप्रकारे केलेले नाही. उदा. 'मनोरंजन' मासिकाच्या १९१५ च्या वसंत अंकात प्रा. वा. ब. पटवर्धनांसारख्या गोखले यांना निकट असलेल्या व विचक्षण बुद्धीच्या विद्वानाने गोखले यांच्या निधनानंतर एक संक्षिप्त लेख लिहिला आहे. हा लेख आकाराने लहान असला तरी माहितीपूर्ण व गोखलेविषयक जिव्हाळ्याने भरलेला आहे. तो गोखलेविषयक माहितीचे विविध आणि महत्त्वाचे कण पुरविणारा आहे. आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रा. फाटक यांनी या लेखाचा उल्लेखही केलेला आहे. तथापि या लेखात आलेली विविध माहिती त्यांनी आपल्या चरित्रग्रंथात समुचितपणे उपयोगात आणली असल्याचे दिसत नाही. ( उदा. गोखले-रानडे यांची पहिली प्रत्यक्ष भेट घडवून आणणारे आबासाहेब साठे यांचा संदर्भ. वरील 'मनोरंजन' अंकात साठे यांचा फोटोही दिलेला आहे. )

या उलट परप्रांतीय व परभाषिक असूनही श्री. नंदा यांनी विविध मराठी साधनग्रंथांचा वा 'केसरी'सारख्या मराठी वृत्तपत्राचा उपोद्बलक पद्धतीने उपयोग करून घेतलेला आढळतो. चरित्रलेखनासाठी सर्व प्रकारची लहानमोठी साधने जमवून, त्यांचे वर्गीकरण करण्याची, त्यांचे गौण–प्रधानत्व लक्षात घेऊन त्या त्या संदर्भात तारतम्याने त्यांचे उपयोजन करण्याची श्री. नंदा यांची मर्मज्ञ हातोटी त्यांच्या गोखले चरित्रात सर्वत्रच प्रकट होते. या प्रकारचा साक्षेप मराठी चरित्र-ग्रंथांत अभावानेच आढळतो. फाटकलिखित गोखले चरित्राप्रमाणे 'साहित्यसम्राट' न. चिं. केळकरलिखित लो. टिळक चरित्रही याला अपवाद नाही. माहितीदृष्ट्या फाटकलिखित गोखले चरित्र तसे भरगच्च आहे. पण ती माहिती विकीर्ण स्वरूपात नोंदविली गेली आहे. ती रेखीव वा एकरसात्मक पद्धतीने प्रकट होत नाही. या दृष्टीने प्रा. फाटक व श्री. नंदा गोखले जीवनातील घटना, पत्रव्यवहार वा व्यक्ती यांची नोंद कशी घेतात, हे तुलनात्मकदृष्ट्या पाहण्यासारखे आहे. प्रा. फाटक गोखलेविषयक पत्रव्यवहाराचे एक गाठोडेच वाचकांना सादर करतात, तर नंदा गोखलेविषयक पत्रव्यवहार अलग न काढता, त्या त्या संदर्भात ते तो मुरवून टाकतात.

श्री. नंदा यांनी आपल्या गोखले चरित्राची आखणी अतिशय पद्धतशीरपणे व बंदिस्त स्वरूपाची केली आहे. त्यांनी आपल्या या ग्रंथाचे चार कप्प्यांत विभाजन केले आहे. ('युगारंभ', 'नेमस्तांचा प्रवक्ता', अंतर्बाह्य विरोध', 'अखेरचे पर्व') आणि यातून गोखलेविषयक आणि गोखले कालविषयक माहितीचा पट क्रमशः त्यातील साभिप्रायतेसह उलगडून दाखविला आहे. त्यातून गोखलेकालीन विविध प्रश्नांचे, द्वंद्व–प्रतिद्वंद्वांचे, परिस्थितिजन्य व व्यक्तिविशिष्ट गुंतागुंतीचे धागेदोरे उलगडले जातात. या साऱ्या पार्श्वभूमीवर गोखले यांचे व्यक्तित्व, दृष्टिकोण, जीवनधारणा, कार्यपद्धती, भावभावना, यश–अपयश सावयवी स्वरूपात साकार होते. गोखले यांच्या बलस्थानांप्रमाणे त्यांची दुर्बलस्थानेही स्पष्ट होतात. श्री. नंदा हे सारे यशस्वीपणे करू शकले याचे कारण त्यांच्या ठिकाणी असलेला विचक्षण-पणाचा आणि सहृदयतेचा अभिजात संगम. व्यासंगदृष्टचा पाहावयाचे तर एखाद्या अभ्यासग्रंथातील नोंदी कशा असाव्यात यांचा एक वस्तुपाठच नंदा यांचा हा चरित्र-ग्रंथ देतो. फाटकग्रंथातही अशा नोंदी आहेत, पण त्यांत नंदा यांच्यासारखी साक्षेप-शीलता नाही. उपलब्ध माहिती भरडून काढण्याकडे, कोणीकडून तरी जमाखर्च पूर्ण करून मोकळे होण्याकडे फाटकांचा कल आहे.

श्री. नंदा आणि प्रा. फाटक यांच्या निवेदनपद्धतीतील फरक लक्षात घेण्याच्या दृष्टीने या दोन्ही चरित्रग्रंथांचे आरंभ आणि शेवट यांची तुलना करून पाहण्यासारखी आहे. श्री. नंदा यांनी आपल्या चरित्राचे उद्घाटन अतिशय वेधकपणे एखाद्या ललितकृतीला शोभेल अशा पद्धतीने केले आहे.

रात्रीचे बारा वाजले आहेत. व्हाइसराय लॉर्ड कर्झन इंपीरिअल कौन्सिलच्या बैठकीचे कामकाज आटोपून कलकत्त्याहून सिमल्यास निघाले आहेत. प्रवासात ते भारतमंत्री जॉर्ज हॅमिल्टन यांना हिंदुस्थानातील घडामोडींचा वृत्तान्त पत्रद्वारा कळ-वीत आहेत. हे पत्र लिहिताना इंपीरिअल कौन्सिलची ताजी बैठक व त्या बैठकीत प्रकट झालेले ना. गोखले यांचे प्रभावी व्यक्तित्व कर्झन यांच्या मनात घोळत आहे आणि त्याचे स्वाभाविक प्रतिबिंब प्रस्तुत पत्रात उमटले आहे.

'ज्यांच्या गुणवत्तेबद्दल कौतुकाने बोलावे असे एकच सभासद कायदेमंडळात आहेत, ते म्हणजे मि. गोखले. त्यांची गुणवत्ता आणि हिम्मत मोठी आहे. ते चित्पावन ब्राह्मण, त्यातूनही कॉंग्रेसवादी आहेत, (१८९७ सालच्या प्लेगच्या वेळी घडलेल्या) पुण्यातल्या प्रकरणाशी त्यांचा संबंध आहे, हे तुम्हाला ठाऊक असेलच ... तथापि त्यांची राजनिष्ठा शंकास्पद नाही, अशी माझी समजूत आहे. एतद्देशीय मनोवृत्ती आणि मते यांच्यापैकी एका महत्त्वाच्या स्तराचे ते प्रतिनिधित्व करतात. मोठे सुसंस्कृत आणि पुष्कळसे विवेकी आहेत.'

पत्रद्वारा आणि खाजगी गुप्त स्वरूपात हे निवेदन व्यक्त झालेले असल्याने येथील कर्झन यांच्या गोखलेविषयक उद्गारांना अस्सलपणा आणि प्रत्ययपूर्णता

प्राप्त झाली आहे. कर्झनसारख्या अहंमन्य, सत्ताधारी व इतर कोणाहीबद्दल सहसा गौरवोद्गार न काढणाऱ्या व्यक्तीने वरील विधान केले आहे. त्यामुळे शत्रुपक्षातून आलेले हे संक्षिप्त उद्गार गोखले यांच्याविषयी खूप काही सांगून, सुचवून जातात. गोखले चरित्राच्या नांदीचे हे सूर गोखले यांच्या पुढील जीवननाटयाची एकंदर दिशा सूचित करतात.

कर्झन यांच्या वरील उद्गारांत गोखलेविषयक कौतुकादराची जशी भावना आहे, तशी साशंकतेचीही. ब्रिटिश राज्यकर्त्यांची ही साशंकता केवळ गोपाळ कृष्ण गोखले या व्यक्तीशी संबंधित नसून ती सर्वच भारतीय पुढाऱ्यांच्या बाबतीत अस्तित्वात असल्याचे नंदा पुढे नमूद करतात आणि या वस्तुस्थितीच्या कारणां-बाबतची वाचकांची जिज्ञासा जागृत करतात. गोखलेचरित्रलेखनाची एक चौकट यातून सिद्ध होते. या चरित्रग्रंथाचा 'युगान्त' हा शेवटही असाच वेधक आहे. तो वाचताना महाभारताचे एखादे पर्व संपल्याचा भाव वाचकांच्या मनात जागृत होतो. वाचकाला तो अंतर्मुख करतो. या प्रकारे अंतर्मुख करण्याची क्षमता फाटक-लिखित चरित्रात अभावानेच आढळते. फाटक यांची गोखलेविषयक काही विधानेही असावी तेवढी काटेकोर नसतात.

उदाहरणार्थ, फाटकलिखित चरित्राचा 'उपोद्घात' पाहावा. या उपोद्घातात फाटकांनी गोखले यांना 'बदलत्या युगाचे प्रतिनिधी' असे संबोधले आहे. हे ठीक असले तरी हे संबोधन तसे अतिव्याप्त आहे. कारण गोखलेकालात गोखल्यांखेरीज बदलत्या काळाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इतरही अनेक व्यक्ती होत्या. त्याच उपोद्घातात फाटकांनी गोखले यांना इतर अनेकांच्या तुलनेने जे संपूर्ण 'आधुनिकत्व' बहाल केलेले आहे आणि गोखले यांनी 'आपण हिंदू असल्याच्या भावनेचे आपल्या विचारसरणीतून उच्चाटण केले आहे' (पृ. वीस) असे जे म्हटले आहे, तेही अविवाद्य नाही. गोखल्यांच्या एकंदर आचारविचारांत, आविर्भावांत, वेषभूषेत, वर्तनक्रमात, आवडीनिवडींत तत्कालीन इतर अनेक भारतीय पुढाऱ्यांच्या तुलनेने अधिक आधुनिकत्व होते, सांप्रदायिकतेपासून मनाने ते दूर होते, हे मान्य केले तरी, एका बाजूने न्या. रानडे आणि दुसऱ्या बाजूने म. गांधी यांच्याशी अनुबंधित असलेले आणि 'राजकारणाचे अध्यात्मीकरण झाले पाहिजे,' असे घोषित करणारे गोखले मनाने हिंदूच असल्याचे दर्शवीत नाहीत काय? गोखले यांनी न्या. रानडेंविषयी वाटणारा आपला आदर–भक्तिभाव ज्या पद्धतीने आणि ज्या भाषेत व्यक्त केला आहे, ती पद्धती व भाषा हिंदुपरंपरेला शोभेल अशीच नाही काय? खुद्द फाटक यांनी गोखले यांचा गुणगौरव करण्यासाठी जी परिभाषा वापरली आहे, (गीता-उपनिषदांचे किंवा मराठी संतांचे संदर्भ) ती गोखले यांचे भारतीय अध्यात्माशी असलेले नातेच सूचित करते.

या बाबतीतील वस्तुस्थिती अशी आहे की, त्या काळातील आगरकरांसारखा

एखाददुसरा कडवा अज्ञेयवादी आधुनिक विचारवंत वगळता, तत्कालीन बहुतेक सर्व पुढाऱ्यांच्या वृत्ति-प्रवृत्तींत जुन्या-नव्या धर्मकल्पनांचे सश्रद्ध मिश्रण झालेले होते. यात परंपराप्राप्त हिंदुविचारांचे जसे काही घटक होते, तसे ख्रिस्तीधर्मप्रणीत इहवादी मानवतावादाचेही. श्री. नंदा यांनी गोखले चरित्रात तत्कालीन सुशिक्षितांना 'हिंदी जेझुइट' अशी जी पदवी दिली आहे (प्रकरण ४) ती या दृष्टीने योग्यच आहे. 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' किंवा 'भारत सेवक समाज' यांसारख्या संस्थांच्या निर्मितीची प्रेरणा वरील दोन धर्मांच्या मिश्रणातूनच जन्माला आलेली होती. हरिभाऊ आपटे यांच्या 'मी' कादंबरीतील भावानंदाने काढलेला मठ याच प्रवृत्तीचा निदर्शक आहे. स्वामी विवेकानंद यांनी काढलेले मठही याच धारणेतून उभे राहिले होते.

फाटक आणि नंदा यांच्या चरित्रग्रंथांच्या मांडणीतील तफावतीचे स्वरूप स्पष्ट होण्याच्या दृष्टीने या दोन्ही चरित्रग्रंथांतील 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया' विषयक प्रकरणे अभ्यासण्यासारखी आहेत. फाटक यांच्या चरित्रग्रंथात या विषयी जी माहिती मिळते, ती केवळ उपयुक्ततेच्या पातळीवर राहते; पण नंदा यांच्या या विषयीच्या प्रकरणातून 'भारत सेवक समाज' जिवंतपणे साकार होतो. या समाजाच्या स्थिति-गतीचे, प्रेरणा-प्रवृत्तींचे, समस्यांचे, त्या सोडविण्याच्या पद्धतीचे, तेथे काम करीत असलेल्या व्यक्तींचे दर्शन श्री. नंदा आपल्या चरित्रग्रंथातून घडवितात. या दृष्टीने श्रीनिवासशास्त्रींच्या दैनंदिनीचा नंदा यांनी करून घेतलेला उपयोग चातुर्यपूर्ण आहे (पृ. ६५८). तीतून भारत सेवक समाजाचे सेवक आणि ना. गोखले यांच्या परस्पर आंतरिक संबंधांवरही भावनिक प्रकाश पडतो. त्यांतील नाजूक धागेदोरे प्रकाशात येतात. गोखले यांच्या स्वभावविशेषांतील शिस्तबद्धतेचे आणि हळवेपणाचेही दर्शन होते. या दृष्टीने या चरित्रातील 'अखेर' हे प्रकरण विशेषच बोलके आहे. या प्रकरणाचा शेवट ना. गोखले यांच्या मृत्युकथनाने झालेला आहे त्याचे भरतवाक्य डॉ. देव यांच्या 'माझ्या चोवीस वर्षांच्या डॉक्टरी पेशाच्या अनुभवामध्ये इतक्या शांतपणे मृत्यूला सामोरी गेलेली व्यक्ती माझ्या पाहण्यात आली नाही.' या उद्गारांनी केले आहे (पृ. ६६८). श्री. नंदा यांनी पुढच्या एका स्वतंत्र प्रकरणात गोखले यांच्या मृत्यूबद्दलच्या विविध प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. यामुळे गोखले यांच्या मृत्यूची ही शोकात्म घटना आपल्या अंतःकरणात निःस्तब्धपणे साठवून घेण्यास वाचकास अवधी मिळतो; फाटक मात्र आपल्या वाचकांना या प्रकारची उसंत मिळू देत नाहीत. मृत्यूच्या घटनेनंतर लगोलगच ते श्रद्धांजलीकडे वळतात. गोखले यांच्या निधनानंतर कोणी कशा प्रकारे शोक व्यक्त केला, याचा तपशील गद्य पद्धतीने नोंदवीत राहतात.

श्री. नंदा यांनी गोखले यांच्या जीवनात आलेल्या विविध व्यक्तींची रेखाटने अतिशय मुलायम पद्धतीने रेखीव आणि प्रत्ययपूर्ण शैलीत केली आहेत. (उदा. कर्झन, वेडरबर्न, फेरोझशहा मेहता, म. गांधी इ.) त्या त्या व्यक्ती आपल्या आंतरबाह्य

वैशिष्टयांसह, आविर्भावांसह येथे मूर्तिमान होतात. गांधी-गोखले संबंधांचे एकंदर चित्रण किंवा न्या. रानडे-गोखले यांच्यामधील नाते श्री. नंदा यांनी अति हळुवार-पणे उलगडून दाखविले आहे, ते मुळातूनच पाहण्यासारखे आहे. असा हळुवारपणा फाटकलिखित चरित्रात अर्थातच नाही.

गांधी, गोखले किंवा नेहरू पितापुत्र यांची चरित्रे आत्मीय भावनेने लिहि-णाऱ्या नंदांना लो. टिळकांबाबत तशी मानसिक जवळीक नसणे स्वाभाविक आहे; पण यामुळे त्यांनी आपले टिळकविषयक मूल्यमापन पूर्वग्रहदूषित होऊ दिलेले नाही. आपल्या चिकित्सक दृष्टीचे उपयोजन करूनही त्यांनी लो. टिळकांविषयीच्या आपल्या आदरभावनेला आणि कौतुकवृत्तीला तिलांजली दिलेली नाही. लोक-मान्यांच्या व्यक्तिवैशिष्टयांची, कर्तृत्वाची, कार्यपद्धतीची कालपरिस्थितीची योग्य ती बूज राखूनच आपले टिळकविषयक मूल्यमापन ग्रथित केले आहे. उदाहरणार्थ, या संदर्भातील त्यांचे हे पुढील विवेचन पाहा :

'ब्रिटिश नोकरशाहीने टिळकांना हयातभर आकसाने वागविले. ब्रिटिश राजवटीकडून टिळकांना कधीच न्याय मिळाला नाही. दुर्दैवाने मृत्यूनंतरही त्यांच्या अंधभक्तांनी टिळकांचे दैवत बनवून त्यांची पूजा केली. त्यामुळे मृत्यूनंतरही त्यांच्या व्यक्तित्वावर तेवढाच मोठा अन्याय झाला आहे, असे म्हणता येईल. पायात शेपटया घालून ज्यावेळी नेमस्त लाचारीने गुमान बसले होते, त्यावेळी परिणामांची तमा न बाळगता अतिबलाढ्य ब्रिटिश राज्याला टिळक आव्हान देत होते, कोणतीही व्यावहारिक तडजोड न पत्करता निर्भेळ स्वराज्याचा कडवा पुर-स्कार करीत होते, ही अंधभक्तांनी उभी केलेली त्यांची प्रतिमा टिळकांना योग्य तो न्याय देत नाही. परिस्थितीचा सर्वांगांनी सूक्ष्म वेध घेण्याची क्षमता, प्रसंगा-नुरूप बदलते डावपेच लढविण्याची लवचिकता व रग, हे कोणत्याही मुरब्बी राज-कारणी पुरुषाच्या ठायी आढळणारे गुण टिळकांच्या ठायी होते. सतत तीस वर्षे सरकारने आकसाची वागणूक देऊनही टिळकांनी या गुणांच्या जोरावरच तिच्या परिणामांवर खरे तर मात केली होती. या त्यांच्या गुणांची योग्य ती कदर अंध-भक्तांकडून केली जात नाही' (पृ. ३६४) फाटकांनी या प्रकारची विवेचक दृष्टी, क्षमता असूनही, आपल्या चरित्रग्रंथातून क्वचितच व्यक्त केलेली आढळते.

पण, या प्रकारची नंदा-फाटक तुलना अधिक विस्तारण्यात अर्थ नाही. एका मर्यादेनंतर ती नंदा आणि फाटक या दोघांवरही अन्याय करणारी ठरण्याचा संभव आहे. कारण या उभयतांचे चरित्रलेखनाचे आदर्शच भिन्नभिन्न आहेत. श्री. नंदा यांच्यासमोर कोणते आदर्श होते – आहेत, याची कल्पना नाही; पण फाटक यांनी ज्या प्रकारे गोखले चरित्र लिहिले आहे, ती चरित्रलेखनपद्धती मराठीत दीर्घकाल रूढ आहे. चरित्रग्रंथाची मांडणी वस्तुनिष्ठ किंवा सर्वस्पर्शी करण्यापेक्षा चरित्रग्रंथातून चरित्रनायकाची बाजू एकेरीपणे मांडण्याकडे या पद्धतीचा कल असतो. हे लेखन,

बहुधा, खंडनमंडनात्मक पद्धतीने केले जाते. ही चरित्रे 'गाऊ त्यांना आरती' पद्धतीची असतात. चरित्रनायकविरोधी जे असेल ते दुर्लक्षण्याकडे कल असतो, किंवा त्याचा विपर्यास केला जातो. बखरलेखक ज्याप्रमाणे बखरनायकाची कैफियत सादर करतात, त्या पद्धतीचे हे लेखन असते. (फाटकलिखित चरित्रातील प्रकरणांच्या नावांत 'कामगिरी' या शब्दाची झालेली पुनरुक्ती या दृष्टीने पाहावी.) दत्तो वामन पोतदारांच्या भाषेत बोलावयाचे तर, मानवीकरणापेक्षा दैवीकरणाकडे किंवा दानवीकरणाकडे बहुतेक चरित्रलेखकांचा कल असतो[१] या प्रवृत्तीची ठळक उदाहरणे म्हणून नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांच्या संदर्भातील वाद स्मरणात येतो. रावबहादूर पारसनिसांनी लिहिलेले ब्रह्मेंद्रस्वामींचे चरित्र व या चरित्रावर इतिहासाचार्य राजवाडे यांनी झाडलेले ताशेरेही[२] या संदर्भात आठवतात. मराठीतील विचक्षण वाचकांचे याबाबतचे असमाधान यातूनच जन्माला आलेले आहे.

याचा अर्थ, मराठीतील सर्वच चरित्रलेखन सुमार उतरले आहे, असा नाही. काही चांगले चरित्रलेखनही झाले आहे. (उदा काशीताई कानिटकर यांनी लिहिलेले डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र.) तथापि विशिष्ट बाजू घेऊन चरित्र-लेखन करण्याची आणि चरित्रनायकविरोधी व्यक्तींना किंवा विचारांना झोडपून काढण्याची महाराष्ट्रीय चरित्रलेखकांची पद्धती राजकीय पुरुषांपुरती तरी अद्यापिही संपुष्टात आलेली नाही, याची साक्ष कै. धनंजय कीर यांच्या चरित्रलेखनपद्धतीतून मिळते. कीर हे अलीकडच्या काळातील एक ख्यातनाम चरित्रकार मानले जातात. त्यांचा त्याबद्दल गौरवही झाला आहे. त्यांनी मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांतून चरित्रलेखन केले आहे. त्यांच्या चरित्रलेखनाचा व्यापही मोठा आहे. म. फुले, म. गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. आंबेडकर, लो. टिळक, छत्रपती शाहू महाराज, अशा विविध प्रवृत्तींच्या आणि प्रकृतीच्या पुरुषांची चरित्रे त्यांनी लिहिली आहेत. पं. नेहरू प्रभृतींची चरित्रे लिहिण्याचा त्यांचा मानस होता, असे म्हणतात.

एकच चरित्रलेखक एवढ्या वेगवेगळ्या प्रवृत्तींच्या व्यक्तींवर कसे काय लेखन करू शकतो, असा प्रश्न पडतो. एका जिज्ञासूने हा प्रश्न कीर यांना

---

१. पां. स. साने (साने गुरुजी) यांच्या गोखले चरित्राला लिहिलेली प्रस्तावना.

२ 'बहुतेक चरित्रग्रंथ बोधदृष्टीने किंवा केवळ चरित्रनायकाचा गौरव करण्याच्या हेतूने लिहिले आहेत, त्यामुळे ते एकांगी झाले आहेत ... ... चरित्रलेखनात काही कलादृष्टी असू शकते, याची आपल्याकडील चरित्रलेखकांस जाणीव असल्याचे दिसत नाही. चरित्रांची मांडणी कौशल्याने कशी करावी याचा विचार फारसा कोणी करीत नाही' (अ. म. जोशी, वाङ्मयेतिहासखंड पाचवा, भाग २, पृ. २३३- संपादक--रा. श्री. जोग. महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन.)

विचारलाही होता 'एकच नट एकाच दिवशी वेगवेगळ्या तऱ्हेची भूमिका वठवू शकत नाही का ?' असे त्यावर त्यांनी उत्तर दिले होते.[१] पण हे उत्तर फसवे आहे. कारण नटाप्रमाणे त्या त्या भूमिकेशी चरित्रलेखकाला केवळ तद्रूप होऊन भागत नाही. चरित्रलेखकाला या शिवाय आणखीही बरेच काही करावे लागते. कारण चरित्रलेखक हा एकप्रकारे इतिहासकारही असतो, याचे यथायोग्य भान धनंजय कीर यांनी आपल्या चरित्रलेखनात बाळगलेले नाही; किंबहुना धनंजय कीर यांचे चरित्रलेखन चरित्रनायककालीन प्रश्नांच्या किंवा परिस्थितीच्या सर्व बाजू विचारात घेऊन लिहिलेले नसते आणि यामुळे त्यात एकांगीपण तरी प्रविष्ट होते किंवा जुजबीपण तरी. जुजबीपणाच्या दृष्टीने त्यांचे फुलेचरित्र तपासून पाहण्यासारखे आहे. फुलेकालीन जीवनाचा, वातावरणाचा, त्यांच्यासमोर असलेल्या समस्यांचा सामग्र्याने आणि सखोलपणे विचार न करता, वृत्तपत्रीय पद्धतीच्या माहितीनेच हे चरित्र भरून गेलेले आहे. कीर यांच्या चरित्रलेखनपद्धतीतील एकांडेपण पहावयाचे झाल्यास त्यांचे सावरकर चरित्र वाचावे.

मराठीत आजही प्रचलित असलेली आणि प्रतिष्ठा पावलेली चरित्रलेखन पद्धती कशी आहे, याची यावरून कल्पना यावी. निदान राजकीय पुढाऱ्यांच्या चरित्रांबाबत तरी हा प्रकार विशेषत्वाने रूढ आहे. यामुळे वाचकांचीही गफलत होते. त्यांना त्या त्या काळातील राजकीय वृत्ती-प्रवृत्तींचे वा व्यक्तिगत कर्तृत्वाचे योग्य त्या पद्धतीने आणि योग्य त्या प्रमाणात आकलन होत नाही. या पार्श्वभूमीवर ही आकलनपद्धती कशी असते, असावी, हे जाणून घेण्याच्या दृष्टीने श्री. नंदा यांच्या या गोखले चरित्राचा प्रस्तुत अनुवाद उपयुक्तच नव्हे तर उद्बोधकही ठरावा.

—आणि हा अनुवाद एका दृष्टीने अगदी योग्य वेळी अवतरत आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीला आता पंचवीस वर्षे पूर्ण झाली आहेत. आज एक वेगळ्या पद्धतीचा आणि वेगळ्या पातळीवरचा संक्रमणकाल आपल्या उंबरठ्यावर येऊन उभा आहे. याची योग्य ती आणि सर्वांगीण दखल घेऊनच सारासार विचाराने आपल्या वाटचालीची भावी दिशा निश्चित करण्याची निकड निर्माण झाली आहे. यासाठी आपल्या भूतकाळाचे यथातथ्य आणि सर्वांगीण आकलन करून घेणे आवश्यक ठरत आहे. जुने पूर्वग्रह बिनळवून नव्या वस्तुनिष्ठ दृष्टीने भूतकाळाकडे पाहिले पाहिजे. या दृष्टीने एकोणिसाव्या शतकातील शेवटची वर्षे आणि विसाव्या शतकाच्या आरंभीची वर्षे, या कालखंडातील महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकारणाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांस प्रस्तुतचे गोखले चरित्र निश्चितच महत्त्वाचे वाटेल.

**गो. म. कुलकर्णी**

---

१ हितगुज : सहा साहित्यिकांशी, प्रा. भास्कर वंदनवार, मंगल प्रकाशन, नागपूर, १९७५, पृ. १९.

# प्रस्तावना

गोपाळ कृष्ण गोखले यांच्या चरित्राच्या लेखनाची तयारी मी सुरू केली, तेव्हा या कामी किती दीर्घकाळ परिश्रम करावे लागणार आहेत, याची मला कल्पना नव्हती. पहिल्या महायुद्धानंतर भारतीय राजकारणाच्या रंगमंचावर महात्मा गांधींचा उदय झाला आणि राजकारणाचे चित्र पार बदलून गेले. इतके की, केवळ गोखल्यांनी पार पाडलेली कामगिरीच नव्हे, तर नेमस्त युगातील साऱ्या नेतृत्वाची कामगिरीच लोकांच्या दृष्टिआड झालेली आहे, ही गोष्ट लौकरच माझ्या लक्षात आली. नेमस्त पुढाऱ्यांच्या व त्यांच्या मौलिक कार्याच्या उपेक्षेला गांधी अर्थातच जबाबदार नव्हते. ज्येष्ठ नेमस्त पुढाऱ्यांचा व त्यांच्या कार्याचा गांधी नेहमीच गौरव करीत. गोखल्यांना तर गांधी आपले राजकीय गुरु मानीत; तेव्हा त्यांच्या कामगिरीची उपेक्षा त्यांच्याकडून होईल अशी शक्यताच नव्हती. नेमस्त पुढारी अस्तंगत झाल्यासारखे होण्याचे खरे कारण वेगळेच होते. पहिल्या महायुद्धानंतर एक नवीन पिढी उदयास आलेली होती, आणि कोणत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत राष्ट्रसभेच्या आरंभीच्या काळातील नेत्यांना स्वातंत्र्याची चळवळ चालवावी लागली होती याची या पिढीला जाण नव्हती.

त्यावेळच्या घडामोडींविषयी आज पुष्कळ नवी माहिती उजेडात आलेली आहे आणि मध्यंतरी बराच काळ लोटल्यामुळे त्या काळच्या घडामोडींकडे सम्यक् भूमिकेतून बघणे आज अधिक शक्य झाले आहे. विशेषतः गोखल्यांना कोणत्या वातावरणात व परिस्थितीत काम करावे लागले, याविषयी आपण आज अधिक यथायोग्य कल्पना करू शकतो. प्रकाशित आणि अप्रकाशित, दोन्ही स्वरूपांचे प्रचंड साहित्य आज उपलब्ध झाले आहे. हिंदी पुढारी, व्हाइसरॉय, भारतमंत्री, गव्हर्नर आणि इतरही व्यक्ती यांच्या रोजनिशा, आठवणी, अप्रकाशित सरकारी कागदपत्रे आणि खाजगी कागदपत्रे, या स्वरूपाचे हे सारे साहित्य आहे. या साऱ्या साहित्याच्या आधारे नेमस्त युगाचा सखोल अभ्यास करणे आज शक्य आहे.

गोखल्यांची राजकीय कारकीर्द राष्ट्रसभेच्या पहिल्या तीस वर्षांच्या कालखंडाशी जवळ जवळ समव्याप्त आहे. राष्ट्रसभेच्या आद्य संस्थापकांपेक्षा गोखले पुष्कळच तरुण होते. या ज्येष्ठ पुढाऱ्यांशी घनिष्ट संबंध जुळून येण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यांचा विश्वास त्यांनी संपादित केला, अभिप्रेत कार्याचे ते सर्वोत्कृष्ट प्रवक्ते बनले. वयाची चाळिशी गाठण्याआधीच हिंदुस्थान आणि इंग्लंड या दोन्ही देशांमध्ये, या देशांच्या आशाआकांक्षांचे सच्चे प्रवक्ते म्हणून त्यांना मान्यता मिळाली. भारतीय राष्ट्रसभेचे पुढारी, इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद, लंडन येथील राष्ट्रसभेच्या ब्रिटिश कमिटीचे विश्वासू सहकारी, आणि इंग्लंडमधील भारताचे अनधिकृत राजदूत या सर्व भूमिका एकाचवेळी गोखल्यांच्या वाट्याला आलेल्या होत्या. भारतीय राजकारणात त्यांची जागा अत्यंत मोक्याची होती, असे म्हणता येईल. दुसऱ्या कोणत्याही हिंदी पुढाऱ्याची गोखल्यांशी तुलना होऊ शकत नव्हती. गोखले जसे राजकारणी होते तसे विचारवंतही होते. फार थोडे राजकीय नेते विचारवंत असतात. भारतात घडत असलेल्या राजकीय नाटकात गोखले एक प्रमुख भूमिका वठवीत होते, इतकेच नाही तर राजकीय घडामोडींचे ते मोठे मार्मिक समीक्षक होते. हिंदी राष्ट्रवाद तसेच हिंदुस्थान व ब्रिटन यांतील संबंध, त्यांच्या इतिहासाविषयीची मौलिक व मार्मिक समज प्राप्त होण्याच्या दृष्टीने गोखल्यांच्या चरित्राचा अभ्यास अतिशय फलदायी ठरणारा आहे.

गोखले, त्यांचे सहकारी आणि हिंदी पुढाऱ्यांमधील त्यांचे टीकाकार, तसेच ब्रिटिश व्हाइसरॉय, भारतमंत्री, गव्हर्नर आणि इतर प्रशासक यांचा पत्रव्यवहार, त्यांची इतर कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे इत्यादी प्रचंड अप्रकाशित साहित्याचा मी चरित्र-लेखनासाठी उपयोग केला आहे. समर्थन वा खंडन करण्यापेक्षा घडामोडींचा अन्वयार्थ लावण्यावर, त्या समजावून घेण्यावर मी अधिक भर दिला आहे. विभिन्न साधनस्रोतांचा उपयोग केल्यामुळे गोखल्यांचे चरित्र व काळ यांविषयीचे विवेचन प्रमाणबद्ध, व संतुलित व वस्तुनिष्ठ होण्यास मदत झाली असेल, अशी मला आशा आहे.

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे; नॅशनल लायब्ररी, कलकत्ता; नॅशनल अर्काइव्हज, नवी दिल्ली; नेहरू मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी, नवी दिल्ली; या संस्थांचे ग्रंथपाल व कर्मचारी वर्ग यांनी मला जी सौजन्यपूर्ण वागणूक दिली आणि मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. लंडनमधील इंडिया ऑफिस लायब्ररी, ब्रिटिश म्युझियम आणि एडिंबरो येथील नॅशनल लायब्ररी या संस्थांमध्ये असलेली अप्रकाशित कागदपत्रे आणि दप्तरे अभ्यासण्यासाठी १९६४ साली मी इंग्लंडला गेलो. रॉकफेलर फाऊंडेशनने दिलेल्या अनुदानामुळे मला इंग्लंडला जाऊन कागदपत्रांचा अभ्यास करणे शक्य झाले. मी रॉकफेलर फाऊंडेशनचा आभारी आहे.

पुस्तकाच्या शेवटी संदर्भग्रंथांची सूची दिली आहे. अनेकांच्या अप्रकाशित दप्तरांचा व कागदपत्रांचा तीत निर्देश केला आहे. ज्या व्यक्तींचा त्यांच्यावर मालकी हक्क आहे वा ज्या व्यक्तींनी ती वेगवेगळया संस्थांना अभ्यासासाठी दान केली आहेत, त्या सर्वांचा

मी ऋणी आहे. तळटीपांमध्ये कमीत कमी संदर्भ मी दिले आहेत; अवतरणे कोठून घेतली आहेत ते दर्शविण्यासाठी मूळ संदर्भ देण्याचे धोरण मी सामान्यतः पाळले आहे.

गोखल्यांचे चरित्र मी लिहावे अशी सूचना मला प्रथमतः पंडित हृदयनाथ कुंझरू व श्री. बी. शिवराव यांनी केली. पंडित कुंझरू, श्री. द. वा. आंबेकर, श्री. एस. आर. वेंकटरामन आणि कै. एस. जी. वझे यांनी गोखले आणि त्यांचा काळ याविषयीच्या आपल्या आठवणी मला सांगितल्या ही त्यांची माझ्यावर मोठी मेहेरबानी होय. प्रोफेसर न. र. फाटक, कै. र. पु. परांजपे आणि गोखल्यांचे जावई न्यायमूर्ती ढवळे यांच्याबरोबर माझ्या ज्या मुलाखती झाल्या त्यांचे मोल मोठे होते. पुस्तकातील छायाचित्रांसाठी श्री. एस. जी. गोखले आणि श्री. एस. आर. वेंकटरामन यांचा मी आभारी आहे.

पुस्तकाचे संपूर्ण हस्तलिखित वाचून उपयुक्त सूचना केल्याबद्दल डॉ. एस. आर. मेहरोत्रा आणि श्री. व्ही. सी. जोशी यांचा मी ऋणी आहे. सरते शेवटी मला माझ्या पत्नीचे ऋण मान्य केले पाहिजे. तिचे सततचे प्रोत्साहन, तिची मदत आणि तिचा समजूतदारपणा यामुळेच केवळ माझ्या हातून या चरित्राचे लेखन पुरे होऊ शकले.

बलराम नंदा

## मराठी आवृत्तीची प्रस्तावना

माझ्या गोखले चरित्राचे मराठी भाषांतर प्रसिद्ध होत आहे ही मला आनंदित करणारी गोष्ट आहे. हिंदी राष्ट्रवादी चळवळीच्या आघाडीवर ज्या काळी महाराष्ट्र होता त्या काळातले गोखले हे एक पुढारी होते. पुणे शहराची त्या काळात विशेष प्रसिद्धी होती. या शहरातील सुशिक्षित वर्गाची बौद्धिक प्रगतीसाठी ख्याती होती; पुण्याच्या सुशिक्षित मंडळींना राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रश्नांमध्ये खोलवर आस्था होती. भारतात व परदेशात घडणाऱ्या घटनांबाबत या मंडळींच्या तक्रारी व तीव्र प्रतिक्रिया स्पष्टपणे प्रकट होत असत. भारतीय राष्ट्रसभेचे पहिले अधिवेशन डिसेंबर १८८५ मध्ये वास्तविक पुण्यासच भरावयाचे, पण आयत्या वेळी पुण्यात कॉलऱ्याची साथ सुरू झाल्यामुळे ते मुंबईस घेणे भाग पडले. राष्ट्रीय जीवनात पुणे आणि पुणेकर यांचे स्थान केवढे महत्त्वाचे होते, हे यावरून लक्षात येईल.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्राने अनेक अलौकिक व्यक्तींना जन्म दिला. रानडे, गोखले आणि टिळक यांची जीवनचरित्रे म्हणजे राष्ट्रीय चळवळीचा आलेखच. एकोणि-

साव्या शतकाचा अखेरचा कालखंड आणि विसाव्या शतकाची आरंभीची वर्षे या काळातील राष्ट्रवादी राजकारणाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने गोखल्यांचे जीवनचरित्र विशेषच महत्त्वाचे आहे. मोक्याच्या उंच जागी उभे राहूनच आसमंतातील प्रदेशांच्या रचनेची सम्यक् उकल होऊ शकते. एका अर्थी, गोखल्यांचे जीवन ही अशी मोक्याची उंच जागा आहे. काही विलक्षण योग जुळून आल्यामुळे वयाची चाळिशी गाठण्याआधीच राष्ट्रसभेच्या उच्चतम नेत्यांच्या वर्तुळात गोखल्यांचा प्रवेश झाला. कुशाग्र बुद्धिमत्ता, उत्कट देशभक्ती, अमोघ वक्तृत्व आणि तितकेच प्रभावी लेखन या त्यांच्या ठायी असलेल्या गुणांचा त्यांच्याकडे नेतृत्व चालून येण्यात मोठा वाटा होता यात काही शंका नाही. पण, ह्याच बरोबर न्यायमूर्ती रानड्यांचे पट्टशिष्य म्हणून त्यांच्या सार्वजनिक आयुष्याची झालेली सुरुवात, दादाभाई नौरोजी, ॲलन ह्यूम आणि फेरोझशहा मेहता या राष्ट्रसभेच्या आद्य ज्येष्ठ नेत्यांची त्यांनी संपादन केलेली मर्जी, यामुळेही इतक्या लहान वयात त्यांना उच्चतम पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली. लाकरच इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये आणि बाहेर देशात व इंग्लंडमध्येही भारतीय जनतेचे सच्चे व अव्वल प्रवक्ते म्हणून त्यांनी मान्यता प्राप्त करून घेतली. भारतीयांच्या आशाआकांक्षा अभिव्यक्त करण्यास त्यांच्याहून अधिक लायक व्यक्ती सापडली नसती. मित्र व शत्रू, दोघांनाही त्यांची कुवत व दानत यांच्याविषयी सारखाच आदर वाटे. स्वराज्यासाठी हिंदी लोक अपात्र आहेत, असा युक्तिवाद साम्राज्यवादी ब्रिटिश राज्यकर्ते करीत असत. त्यांचा युक्तिवाद किती मतलबी व खोटा आहे याचा जिवंत, चालताबोलता पुरावा गोखल्यांच्या रूपाने अस्तित्वात आला होता.

समकालीन दस्तऐवज व कागदपत्रे यांच्या आधारे गोखल्यांचे जीवन, व्यक्तित्व, कार्य व विचार यांची समग्रतेने उकल करण्याचा मी प्रयत्न केला आहे. तत्कालीन पुण्यातील वादंगांची तीव्रता आणि जहाल–मवाळ या दोन तटांमधील वैमनस्ये यामुळे गोखल्यांच्या कामगिरीची मौलिकता दृष्टिआड झाली, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. भारतीय रंगमंचावर महात्मा गांधींचा प्रवेश झाल्याने या उपेक्षेत भरच पडली. किंबहुना सारेच नेमस्त पुढारी अस्तंगत झाल्यासारखे झाले. स्वतः गांधी गोखल्यांना गुरुस्थानी लेखीत ही गोष्ट सुविदित आहे. गोखल्यांच्या ठायी बुद्धिमत्ता व चारित्र्य यांचा झालेला संयोग, राजकारणातही नीतितत्त्वांच्या पालनाविषयीचा गोखल्यांचा आग्रह, त्यांचा साधेपणा व वैराग्यशीलता, आणि नाना प्रकारचे मोह टाळत व धोके पत्करूनही कर्तव्याचे पालन करण्याचे त्यांचे असिधाराव्रत, यांमुळे आदर्श राजकारणी पुरुष म्हणून गोखल्यांकडे गांधी आकृष्ट झालेले होते.

१९०१ साली इंपीरिअल कान्सिलवर सभासद म्हणून गोखल्यांची निवड झाली. त्यानंतरच्या काळात पुणे वा मुंबई, अशा कोणत्याच स्थानाशी वा प्रदेशाशी ते जखडलेले राहिले नाहीत; स्थानीय व प्रादेशिक अस्मितेशी व हितसंबंधांशी स्वतःला बांधून घेण्याची गरज त्यांना उरली नाही. ही मोठी सुदैवाची गोष्ट घडून आली, असे

मागे वळून पाहता लक्षात येते. त्यांच्या आयुष्याची ठरलेली चौदा वर्षे राष्ट्रीय रंगमंचावरचे एक प्रमुख नेते म्हणून ते वावरले. त्यांच्या ठायी असलेले निर्विवाद गुणविशेष आणि संकुचित धार्मिक व प्रादेशिक निष्ठांपासून असलेली त्यांची पूर्ण अलिप्तता, यांमुळे सान्या देशाचे पुढारीपण करण्याच्या दृष्टीने गोखले हे सर्वथैव योग्य पुरुष होते. ज्या धैर्याने व निर्भिडपणे त्यांनी देशाचा कैवार घेतला त्यामुळे सुशिक्षित भारतीयांचे ते लाडके नायक ठरले. उपरोधाची गोष्ट अशी की, गोखल्यांच्या मवाळपणाने सुशिक्षित भारतीय प्रभावित झाले असे आढळत नाही; सरकारच्या धोरणांची गोखले ज्या परखडपणे चिकित्सा करीत त्यामुळे ते प्रभावित होत. सरकारी प्रवक्ते प्रशासकीय व फडणिशी व्यवहारांविषयी जी निवेदने करीत त्यांमधील गफलती व भ्रम सरकारी अहवालांतील तथ्ये व आकडेवारी यांचा सज्जड आधार घेऊन गोखले जेव्हा उघड पाडीत तेव्हा बडे बडे ब्रिटिश अंमलदार गोखल्यांच्या शरसंधानाने घायाळ होत, अस्वस्थ होऊन चरफडत. गोखल्यांची भाषणे वाचताना वा ऐकत असताना गोखले आपल्याच मनातील विचार आणि आकांक्षा यांना शब्दरूप देत आहेत असा प्रत्यय मोतीलाल नेहरू, तेजबहादूर सप्रू, मोहमदअली जिना आणि सी. वाय. चिंतामणी यांसारख्या व्यक्तींना येई. त्याग आणि समर्पण यांचे मूर्तिमंत प्रतीक गोखल्यांच्या रूपाने आपल्यापुढे साकार झालेले ते पहात. स्वतः आपण गोखल्यांचे अनुकरण करू शकत नाही, ही जाणीव गोखल्यांविषयीच्या त्यांच्या आदरात भर टाकी.

हिंदुस्थानविषयक ब्रिटनच्या साम्राज्यवादी धोरणांवर गोखल्यांनी चढविलेल्या हल्ल्यांना तोंड देण्याची कामगिरी ज्या अनेक व्हाइसरॉय व व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांना पार पाडावी लागली, त्यांची मने गोखल्यांविषयी सदैव शंकित राहावीत ही गोष्ट मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. या हिंदी राजकारणी पुढाऱ्याचे युक्तिवाद खोडूनही काढता येत नव्हते, आणि अन्य उपायांनी त्यांचे तोंड बंद करणेही शक्य नव्हते; याचीही त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यांच्या खाजगी पत्रव्यवहाराचे आलोचन केले असताना, गोखल्यांच्या डावपेचांविषयी व हेतूविषयीचा संशय एकीकडे खोलवर त्यांच्या मनात घर करून राहिल्याचे जसे स्पष्ट होते तसेच दुसरीकडे, गोखल्यांच्या असामान्य कर्तृत्वाविषयी चोरटा आदरभावही त्यांना सतत वाटत आला आहे, असे दिसते.

आपल्या देशावर परकीयांचे राज्य असावे याचा गोखल्यांना मनापासून तिटकारा होता. पण हिंदी समाजापुढील सान्याच अडचणी वा समस्या ब्रिटिशांच्या राजवटीमुळे उत्पन्न झालेल्या आहेत असे त्यांचे मत नव्हते. ब्रिटिशांचे दास्य हिंदी लोकांनी झुगारून द्यावे यासाठी तर त्यांचा प्रयत्न होताच; पण, मुळात ज्या उणिवांमुळे, दोषांमुळे देशावर पारतंत्र्याची आपत्ती ओढवली, त्या उणिवांचे व दोषांचे, दौर्बल्याचे निराकरणदेखील त्या बरोबर व्हावे यासाठीही त्यांचे प्रयत्न होते. ब्रिटिशांबरोबर आपली जी गाठभेट पडलेली होती तिचा फायदा उठवून हिंदुस्थानात एक इहवादी, आधुनिक व लोकशाहीसंपन्न राष्ट्राची उभारणी करावी, ही रानड्यांची दृष्टी गोखल्यांनीही आत्मसात केली होती. हे काम

पुरुषार्थाचे असल्याची जाणीव गोखल्यांना होती. 'कधी कधी मला असे वाटते की फार मोठे आव्हान आपल्या देशापुढे उभे आहे, तसे आव्हान जगातील दुसऱ्या कोटल्याच देशासमोर आजवर उभे झालेले नाही' असे गोखल्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. अनेकांनी एकत्र येऊन सांघिक पद्धतीने, शिस्त सांभाळून काम करण्याचा संस्कार रुजणे, तीरीत अंगी बाणणे हे निकोप व सुदृढ राजकीय जीवनासाठी आवश्यक आहे – ही त्याची एक पूर्वशर्तच आहे – अशी त्यांची धारणा होती. सत्ता वा प्रभुत्व संपादनासाठी चाललेली व्यक्तींची वा गटांची सततची स्पर्धा म्हणजे राजकारण; अशी त्यांची राजकारणाची व्याख्या नव्हती. देशाचे पुनरुत्थान घडवून आणण्याचे साधन म्हणून गोखल्यांनी राजकारणाचा अवलंब केला होता. अभ्यासू तरुणांनी दीर्घकाळ प्रशिक्षण घेऊन, तपःपूत बनून अनुशासनबद्धरीत्या राजकारणात उतरल्याखेरीज राजकीय जीवनाची पातळी उंचावणार नाही याची त्यांना खात्री होती. म्हणूनच त्यांनी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया' सोसायटीची स्थापना केली. राजकीय कार्यास वाहून घेणारे हिंदसेवक तयार करणे हा या संस्थेचा उद्देश होता. हिंदसेवकांची जीवनदृष्टी व मनोवृत्ती काय असावी याविषयी सोसायटीच्या घटनेत म्हटले होते :

> 'देशप्रेमाने अंतःकरण इतके ओतप्रोत असावे की अन्य कोणत्याही गोष्टीचे त्यापुढे महत्त्व वाटू नये. मातृभूमीसाठी त्याग करण्याच्या प्रत्येक संधीने मनात आनंदाच्या ऊर्मी उसळून याव्यात इतकी उत्कट देशभक्ती, कोणत्याही अडचणीने वा संकटाने डगमगून न जाता सदैव पुढेच वाटचाल करीत राहण्याइतका मनाचा दृढनिश्चय, देशाच्या उज्ज्वल भवितव्याविषयी अविचल श्रद्धा, ईश्वरी योजनेच्या युक्ततेविषयी निःशंकता यांची शिदोरी बरोबर घेऊन सेवकाने आपल्या जीवितकार्यास आरंभ करावयाचा आहे. देशसेवेमध्ये आपल्या हाडाची काडे करण्यातच त्याने भक्तिभावाने धन्यता मानावयाची आहे.'

ऐंशी वर्षांनंतर आज हे शब्द आपणास फार स्वप्नाळू, आदर्शवादी वाटतील. पण मोजक्या स्त्रीपुरुष व्यक्ती जरी अशा उत्कट ध्येयवादाने प्रेरित झाल्या, आणि त्यांनी देशसेवेच्या कार्याला वाहून घेतले तरी भारताचा चेहरामोहरा पालटण्याच्या कामी त्यांचा मोठा हातभार लागेल यात शंका नाही.

**बलराम नंदा**

# ऋणनिर्देश

श्री. बलराम नंदा यांचे गोखलेचरित्र वाचण्यापूर्वी माझ्याही मनात गोखल्यां-विषयी कचखाऊ या अर्थाने, नेमस्त या स्वरूपाची, चुकीची प्रतिमा रुजली होती. कायदेभंगाच्या पद्धतीने देशव्यापी लढे उभारणाऱ्या महात्मा गांधींनी गोखल्यांना गुरू का मानले याचे मर्म नंदांनी लिहिलेले चरित्र वाचल्यावर ध्यानी आले. नेमस्त व जहाल अशी, स्वतःस जहाल म्हणविणाऱ्यांनी रूढ केलेली विभागणी अद्या-पिही शिष्टमान्य व प्रभावी आहे. पण ती फसवी आहे, आणि भारतीय स्वातंत्र्याचे राजकारण समजून घेण्याच्या दृष्टीने चुकीच्या दिशेने नेणारी आहे याचेही दर्शन नंदांचे गोखलेचरित्र वाचून झाले. म्हणून, पहिले ऋण श्री. नंदा यांचे.

महात्मा गांधी, नेहरू पितापुत्र, व गोखले ही नंदा यांची तिन्ही चरित्रे अव्वल दर्जाची आहेत. या तिन्ही चरित्रग्रंथांचा मराठी अनुवाद प्रसिद्ध व्हायला हवा असे मनात आले. त्यातही, गोखले चरित्र तरी मराठीत यायलाच हवे असे तीव्रतेने वाटले. गोखले महाराष्ट्राचे आधुनिक काळातील थोर सुपुत्र, पण त्यांना महाराष्ट्रीय उच्चशिक्षित वर्गाने आजवर न्याय दिलेला नाही. या चरित्रग्रंथाचा मराठी अनुवाद प्रसिद्ध होऊ शकला तर गोखले त्यांच्या यथार्थ स्वरूपात महाराष्ट्रीय समाजापुढे प्रगटतील, आणि गोखल्यांच्या आपल्यावरील ऋणाची अंशत: तरी फेड होईल, या भावनेने विश्वकर्माचे श्री. राजाभाऊ माटे यांच्यापाशी जेव्हा मी हा विषय काढला तेव्हा, क्षणाचाही विलंब न करता, त्यांनी प्रस्ताव उचलून धरला. श्री. नंदा यांचे गोखलेचरित्र मराठीत प्रसिद्ध व्हावे याविषयी राजाभाऊंना माझ्याइतकेच अगत्य सदैव वाटत आले आहे. नंदांच्या तिन्ही चरित्रग्रंथांचे मराठी अनुवाद प्रसिद्ध करण्याची त्यांची फार इच्छा होती. पण वैयक्तिक व व्यावहारिक अडचणींमुळे आता ती गोष्ट शक्यतेच्या कोटीत राहिली नाही ही गोष्ट वेगळी.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे कर्तबगार व विचक्षण सरव्यवस्थापक श्री. रवि दयाळ व श्री. नंदा यांनी अत्यल्प रॉयल्टीच्या मोबदल्यात मराठी अनुवाद प्रसिद्ध करण्यास तत्परतेने अनुमती दिली. यासाठी त्यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

